Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 510 – 514
DOI: 10.5281/zenodo.10136878

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांच्या राजकीय स्वातंत्र्य चळवळीमधील महिलांचा सहभाग

प्रा. डॉ. श्रीमती एस. जे. माने,[1] प्रा. एम. एल. सोनटक्के[2]

[1]राज्यशास्त्र विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर ४१६२०३ महाराष्ट्र, भारत

[२]इतिहास विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर ४१६२०३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]sandhyamanesmk@gmail.com; [2]mlsontakke99@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. आजच्या स्त्रीचे जीवन ध्येय फक्त माता, सून एवढ्या सांसारीक जबाबदाऱ्या न सांभळता स्वत:चे अस्तित्व शोधून आपला व्यक्तिमत्वाचा विकास घडवून गगनाला गवसनी घालण्यासाठी ती प्रयत्नशील असलेली दिसून येते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात ती यशाची पादाक्रांत करत आहे. मात्र स्त्रियांच्या आजच्या काही प्रमाणात प्राप्त झालेल्या या यशोगाथे पाठीमागे अनेक समाजसुधारकांच्या विचारांची व कार्याची पार्श्वभूमी आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री-पुरुष समानता, स्त्री शिक्षण, स्त्री विकास यासाठी कार्य केले. या ठिकाणी विशेष उल्लेख राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा करावा लागेल कारण भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये तत्कालीन परिस्थिती पाहता फार मोठ्या संख्येने स्त्रियांचा सहभाग हा महात्मा गांधींमुळेच शक्य झाला. महात्मा गांधींच्या काळात राजकीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये स्त्रियांनी जो सहभाग घेतला त्याचा थोडक्यात अभ्यास या शोधनिबंधाच्या माध्यमातून केलेला आहे.

## उद्देश

१. महात्मा गांधीच्या काळातील तत्कालीन परिस्थिती अभ्यासणे.

२. महात्मा गांधीच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांच्या सहभागाविषयी अभ्यास करणे.

## विषय मांडणी

समाज व्यवस्थेमध्ये जीवन जगताना स्त्री-पुरुष हे दोन्ही घटक महत्त्वाचे ठरतात, त्याशिवाय अपत्यनिर्मिती होऊ शकत नाही. पण भारतीय समाज व्यवस्थेचा मागोवा घेताना इथे मात्र आपणांस स्त्री-पुरुष समानतेच्या ऐवजी असमानता, विषमता दिसून येते. इथल्या प्रतिगामी विचारसरणी असलेल्या समाजातील घटकांनी स्त्रीच्या कर्तेपणाला नाकारून तिचे क्षेत्र चुल व मूल एवढ्यासाठीच बंदिस्त करून ठेवले. तिच्यावर धर्मशास्त्राचे तशीच सामाजिक बंधने

घालून तिला तिच्या इच्छेप्रमाणे जगण्याचा अधिकार किंबहुना तिच्या शरीरावरचा तिचा स्वत:चा हक्क सुध्दा नाकारला होता. अंधश्रध्दा, अनिष्ट चालिरिती, परंपरा याचे पालन तिने काटेकोरपणे करावे यासाठी तिला मर्यादा घालण्यात आल्या होत्या. एकूणच त्या काळात स्त्रीचे जीवन पुरुषाच्या हातातली कळसूत्री बाहुली प्रमाणे होते.

इंग्रजांच्या आगमनानंतर इथल्या समाजाला पाश्चात्य वाङ्:मयाची, साहित्याची ओळख झाली, माहिती झाली. इथल्या शिक्षित तरुणांना आपली भारतीय व्यवस्था कशी विषमतेवर आधारीत आहे याचे आकलन होऊ लागले. समाजाची अर्धी शक्ती ही स्त्री आहे व तिचा सर्वोतोपरी विकास होणे आवश्यक आहे हे ओळखून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणास चालना दिली. अशा अनेक समाजसुधारकांनी पुढे जाऊन स्त्री शिक्षण, बहुजनांच्या शिक्षणास समाजातील प्रतिगामी विचारसरणीचा विरोध पत्करून कार्य केले. तसे पाहता तो कालखंड हा इंग्रज राजवटीचा होता. भारत पारतंत्र्यात होता. स्वातंत्र्याचे महत्त्व ओळखून अनेक क्रांतीकारक, सामान्य जनता आपल्या प्राणांची आहुती देऊन स्वातंत्र्यासाठी लढत होती. याच स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व लो. टिळकानंतर आपण पाहतो ते म्हणजे महात्मा गांधी यांच्याकडे आले होते.

सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या तत्त्वांना प्रत्यक्ष समाजजीवनाच्या प्रक्रियेत उतरवून हा स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधी लढत होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत त्यावेळी स्त्रियांचा सहभाग अतिशय तुरळक व प्रतीकात्मक स्वरुपात होता. अशावेळी महात्मा गांधीच्या आगमनाने हा लढा स्त्री व पुरुष असा सर्वसमावेशक झाला. याचा उल्लेख आपणांस महात्मा गांधीच्या 'हिंदस्वराज्य' या पुस्तकात आढळतो. महात्मा गांधी म्हणतात, "स्वातंत्र्य संपादनाच्या कामी पुरूषांपेक्षा स्त्रिया जास्त सहाय्य करतील, अशी माझी खात्री आहे. अनात्याचाराचे तत्त्व समजावून घेण्यात त्या पुरुषांपेक्षा अधिक लायक आहेत, असे मला वाटते. त्या दुर्बल आहेत असे पुरूषांना अरेरावीच्या भरात वाटते. तसे नाही, तर त्यांना सत्य स्वरुपाचे धैर्य आहे आणि आत्मत्यागाची स्त्रियांची शक्ती पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने विशाल आहे." एकूणच स्त्रीया दुर्बल नाहीत, सबल आहेत अशी भूमिका महात्मा गांधी यांनी मांडलेली यावरून लक्षात येते.

**गांधीपर्वात सर्वसामान्य स्त्रियांचा राजकीय स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग**

सर्वसामान्य स्त्रियांबाबतीत बोलायचे झाल्यास राजकीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्रीचा सहभाग हा आत्यंतिक महत्त्वाचा असल्याचे महात्मा गांधी यांच्या लक्षात आले होते व यास अनुसरून महात्मा गांधी यांनी स्त्रियांच्या राजकीय सहभागाबद्दलच्या त्याच्या दृष्टीकोनालाही विस्तारीत केले होते. गांधीनी राजकारणाची परिभाषा व्यापक करून 'घर' राजकारणाच्या कक्षेत आणले. घरातील स्त्रीला अधिक ताकदवान मानत त्यांनी राष्ट्रनिर्मितीच्या संघर्षात घरातील पुरुषांच्या बरोबरीने तिलाही स्थान दिले. त्याकाळी हाताने चरख्यावर सूतकताई करणे हे राजकीय सहभागाचे प्रतिक मानले गेले. गांधीनी चरखा हा राजकीय संदेश म्हणून वापरला, जो नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ ठरविलेल्या गृहिणीच्या हातात दिला, जेणेकरून ती नवराष्ट्रनिर्मितीच्या कामात सद्सद्विवेक राखणारी प्रतिक ठरली. स्वाभाविकच घराघरात चरखा पोहचला व अशा पद्धतीने घरात राहूनही स्वातंत्र्यलढ्याच्या राजकीय कार्यात आपण सहभागी असल्याची भावना त्याकाळात स्त्रियांना होऊ लागली होती. असे म्हणता येईल की, महिलांच्या एकूणच सामाजिक, राजकीय सक्रियतेबद्दल महात्मा गांधी यांनी अभ्यासपूर्ण भूमिका बजावत तत्कालीन स्वातंत्र्यसंग्रामाच्या लढ्यामध्ये स्त्री सहभागाची एक सकारात्मक ऊर्जा निर्माण केली. त्यांनी कुटुंबापासून ते देशाच्या राजकारणापर्यंत एक वैचारिक, कृतीशील स्त्री-पुरूष समानतेचा पाया घालण्याचे काम केले.

महात्मा गांधींनी त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानात घरातील स्त्रीला एक महत्त्वाचे स्थान निर्माण करून दिले. साधारणत: 1920 च्या दशकात 'चरखा' हे राजकीय स्वातंत्र्यलढ्यात स्त्री सहभागाचे महत्त्वाचे प्रतिक ठरले. नंतर मात्र मीठाच्या सत्याग्रहात स्त्रिया रस्त्यावर उतरून महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली राजकीय स्वातंत्र्य चळवळीचा लढा लढताना दिसून येतात. म्हणजेच सार्वजनिक कार्यात नंतरच्या काळात स्त्रिया सक्रिय राजकीय चळवळीत महत्त्वाचा

घटक झालेल्या दिसून येतात आणि हे सर्व महात्मा गांधींच्या विचारांच्या व कार्यांचा परिणाम असल्याचे स्पष्ट होताना दिसते.

**महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी**

महात्मा गांधी यांच्यावर त्यांच्या आईचे चांगले संस्कार झाले होते. महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांचे महात्मा गांधीच्या सर्वांगिण कार्यात फार मोठं स्थान होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या आंदोनलात कस्तुरबा गांधी यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. महात्मा गांधीच्या खांद्याला खांदा लावून कस्तुरबा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केले. महात्मा गांधीच्या प्रत्येक कामात कस्तुरबा सोबत राहून त्यांची सगळी काळजी घेत असत. दक्षिण आफ्रिकेतील आंदोलन असो 1930 च्या मिठाच्या सत्याग्रहात कस्तुरबा गांधी यांनी भाग घेतला व स्त्री सत्याग्रहींचे नेतृत्व त्यांनी केले. बिहारमधील चंपारण्य आंदोलन असेल अशा विविध आंदोलनामध्ये लढ्यामध्ये महात्मा गांधी बरोबर कस्तुरबा गांधी असत. एकूणच महात्मा गांधी यांच्या लढ्याचा अभ्यास हा कस्तुरबा गांधी यांच्याशिवाय अपूर्ण आहे. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या कार्यात कस्तुरबांनी आपले सर्वस्व अर्पण केले होते.

**महात्मा गांधी बरोबर स्वातंत्र्यलढ्यामध्ये असणाऱ्या स्त्रिया**

गांधी कालखंडातील सर्वात पहिले आंदोलन म्हणजे असहकार आंदोलन होय. स्त्रियांनी आंदोलनात कसा भाग घेतला पाहिजे याबद्दल गांधीजी म्हणतात, "स्त्री आपल्या मुलांच्या शरिराचे पोषन संगोपन करते, त्याच प्रमाणे तिने मनात स्वातंत्र्य निर्भयता, दृढता हे गुण बाळगावेत." यावरून महात्मा गांधीनी आंदोलनासाठी स्त्रियांची मानसिकता बळकट करण्यावर भर दिलेला होता, असे दिसून येते.

1920 नंतरच्या काळापासून गांधीजी हे स्वातंत्र्यलढ्यातील महान पर्व ठरले. गांधीजींच्या विचार व कार्याने प्रेरित होऊन अनेक स्त्रिया आपआपल्या परीने स्वातंत्र्य सग्रामात सक्रीय झालेल्या दिसून येतात. महात्मा गांधीजींचा प्रभाव हा नामवंत घराण्यातील स्त्रियांपासून ते अगदी सर्वसामान्य स्त्रियांपर्यंत विस्तारलेला दिसून येतो. ॲनी बेझंट, नेहरू घराण्यातील पुरूष व त्याचबरोबर स्त्रियाही राजकारणात आलेल्या दिसतात. मोतीलाल नेहरू यांच्या पत्नी स्वरुपादेवी, कन्या विजयालक्ष्मी पंडित, कृष्णा हाथीसिंग, नात इंदिराजी यासर्व तत्कालीन उच्च प्रतिष्ठित घराण्यातील ज्यांच्या पायाशी ऐश्वर्य लोळण घेत होते, अशा या स्त्रियांनी सर्व सुखी जीवनाला तिलांजली देत विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकत महात्मा गांधीजींच्या आग्रहामुळे स्वदेशीचा पुरस्कार करून जाडीभरडी खादी वापरायला सुरुवात केली. चरख्यावर सूतकताई करण्यात सुरूवात केली. ब्रिटीश मालावर बहिष्कार, पदव्यांचा त्याग अशा महात्मा गांधींनी अंमलात आणलेल्या या कृतीशील कार्यक्रमात समाजातील उच्च प्रतिष्ठित, राजकीय नेत्यांच्या कुटुंबातील स्त्रियांनी सक्रिय सहभाग घेऊन गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्यात उतरलेल्या दिसतात.

गांधी युगाच्या सुरुवातीलाच लाहोरची लाढोराणी झुत्शी ही 1918 मध्ये गांधीजीची अनुयायी बनली. स्वातंत्र्य लढ्यातील सत्याग्रहींना जीवनावश्यक वस्तु पुरविण्याचे कार्य केले. गांधीजींच्या दारूबंदी, परकीय वस्तुंवर बहिष्कार अशा सारख्या निदर्शनात तिने भाग घेतला. गांधीजींच्या पट्टशिष्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अवंतिकाबाई गोखले ज्यांनी चंपारण्यातील सत्याग्रहापासून गांधीजींना साथ दिली. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व सबलीकरणासाठी "हिंदू महिला समाजाची" स्थापना केली. 1930 व 1932 सालच्या मिठाच्या सत्याग्रहात मुंबईतून ज्या शेकडो स्त्रिया सामिल झाल्या त्याचे श्रेय अवंतिकाबाई गोखले यांना जाते. महात्मा गांधीजींनाही आपण दलित व स्त्रियांकरीता जे काम करू इच्छितो त्यासाठी त्यांना अवंतिकाबाई सारखीच कार्यकर्ता आपल्याबरोबर हवी असे वाटले आणि महात्मा गांधींनी त्यांच्या बद्दल व्यक्त केलेली भूमिका पुढे योग्यही ठरली. त्यांनी सूतकताईचे वर्ग, विलायती वस्तूंवर बहिष्कार, दारुबंदी अशी विविध कार्ये, स्त्री आरोग्य, स्वातंत्र्य चळवळीतील जहाल भूमिका याबाबत त्या सतत अग्रेसर राहिल्या. त्यांनी

केलेले सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील कार्य आणि भोगलेली कारावासाची शिक्षा स्वातंत्र्यलढ्याला पूरक व मार्गदर्शक ठरली.

1919 साली गुजरातमधील हंसा मेहता यांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊन सायमन कमिशनला विरोध केला तर बंगालच्या कोकीळा कवियत्री सरोजिनी नायडू यांनी महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. स्त्री-पुरुष समानतेसाठी त्यांनी स्त्री स्वातंत्र्य चळवळ सुरू ठेवली होती. 1930 मध्ये झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात त्यांचा सहभाग होता. त्यावेळी धारासना येथील मिठागरात जाऊन बेकायदा मीठ बनविणाऱ्याच्या विरोधात सत्याग्रहींचे नेतृत्त्व सरोजिनी नायडू यांनी केले होते. एकूणच त्यांनी दांडी यात्रेत आपला सक्रीय सहभाग नोंदविला होता. स्वतंत्र भारतात त्या पहिल्या महिल्या राज्यपाल होत्या.

गांधी युगात बंगालच्या मातंगिनी हाजरा यांनी महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने आणि गांधीजींच्या प्रेरणेने महत्त्वपूर्ण स्वातंत्र्यलढा दिला. त्यांनी सूतकताई केली तसेच स्वत: त्या स्वदेशी मालाचा स्वीकार करून खादी कपडे वापरत. त्यांनी कित्येकवेळा या स्वातंत्र्य आंदोलनामध्ये तुरुंगवासही भोगला. 1942 च्या भारत छोडो आंदोलनामध्ये त्यांनी तब्बल 6000 नागरिकांचे नेतृत्त्व केले. एवढा मोठा जनसागर घेऊन त्या तामलुक पोलीस स्टेशन ताब्यात घेण्यासाठी निघाल्या असताना ब्रिटीशांनी त्यांच्यावर गोळीबार केला व त्यात त्या शहीद झाल्या. शहीद होतानाही त्यांनी आपल्या हातातून तिरंगा सुटू दिला नाही. मृत्यूला सामोरे जातानाही त्यांचे अखेरचे शब्द ‘वंदे मातरम’ हेच होते. गांधीजी प्रमाणेच राहणाऱ्या मातंगिनी यांना लोक ‘ओल्ड लेडी गांधी’ किंवा ‘बुढी गांधी’ म्हणून ओळखत. याच बंगाल प्रातांतील स्त्रियांमध्ये देशबंधुदास यांच्या पत्नी वासंतीदेवी व बहिण उर्मिलादेवी यांचे स्वातंत्र्यलढ्यामध्ये अमुल्य असे योगदान होते. याच बरोबर नीनाबाला मुखर्जी, क्षीरोदसुंदर चौधरी, सरलादेवी चौधुराणी, दुर्गादेवी बोहरा, प्रितीलता वड्डेदार, सुशीलादीदी, कमलादिदी अशा अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदवला होता. मणिबेन पटेल, लिलावती मुन्शी, मृदुला साराभाई, नेली सेनगुप्ता या गुजराथी स्त्रिया तसेच आसामच्या अनुप्रिया बरुआ, सुधालता दत्त, बिहारच्या राजेंद्रकुमारी मिश्र, श्रीमती सरस्वती, डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन या स्त्रियांनी महात्मा गांधींनी पुकारलेल्या स्वातंत्र्य लढ्याच्या कार्यात सहभाग घेतला होता. सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी अमलप्रभा दास, कमला नेहरू, विजयालक्ष्मी पंडीत, सत्यभामाबाई कुवळेकर, कनकलता बारुआ, अरूणा असफअली, उषा मेहता, पद्मजा नायडू अशा अगणित भारतीय स्वातंत्र्य संग्रामात महात्मा गांधींच्या प्रेरणेने बरोबरीने काम केले.

मिठाचा सत्याग्रह, सविनय कायदेभंगाची चळवळ, चलेजाव चळवळ अशा सर्व स्वातंत्र्यसंग्रामाच्या आंदोलनात महात्मा गांधीजींच्या समवेत शेकडो स्त्रियांनी स्वयंस्फूर्तीने भाग घेतला. गांधींनी केवळ स्त्री प्रश्नासाठी स्त्रियांनी राजकीयदृष्ट्या संघटित व्हावे असे मानले नाही. स्त्रियांनी राजकीय सत्तेच्या साठीमारीत न पडता अहिंसेच्या शक्तीने लोकांचे ह्रदयपरिवर्तन करून समाज परिवर्तनाचे आंदोलन चालवावे असे त्यांचे मत होते. स्त्रियांच्या आतापर्यंतच्या ‘अबला’पण देणाऱ्या स्वभावगुणांचाच वापर गांधींनी त्यांचे सर्वात प्रभावी शस्त्र बनविण्यात केला. हिंसेचे मर्दानीपणाशी जोडलेले नाते मानवी समाजाला उध्दवस्त करील हे जाणून तथाकथित मर्दानगी टाकून देऊन स्त्री-पुरुष दोघांनीही त्याग, प्रेम, सहनशीलता हे स्त्री गुण आत्मसात करून अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग अनुसरावा असे त्यांना वाटत होते व या भूमिकेतूनच महात्मा गांधी यांनी राजकीय स्वातंत्र्याचा लढा समाजातील स्त्री वर्ग व पुरुष वर्ग यांना एकत्रित घेऊन लढला.

**निष्कर्ष**

1. भारतीय स्त्रियांचे सार्वजनिक जीवनामध्ये स्थान निर्माण करण्याचे मोठे काम महात्मा गांधींनी केले.
2. सर्वसामान्य पारंपारिक स्त्रियांपासून ते समाजातील उच्चभ्रू घराण्यातील स्त्रियांना राजकीय स्वातंत्रलढ्यामध्ये उतरविण्याचे कठीण काम महात्मा गांधींनी केले.

**संदर्भ सूची**

१. गवाजकर रोहिणी, ‘भारतीय महिला व स्वातंत्र्याचा लढा : 1857 ते 1947’, ‘साधना’ स्वातंत्र्य सूवर्ण महोत्सव विशेषांक, संपादक- वसंत बापट, 15 ऑगस्ट 1997.

२. शतकानंतरच्या वळणावर – विचारवेध संमेलनातील निवडक निबंधाचा संग्रह, आंबेडकर अकादमी, सातारा, 19 जून 2006.

३. फडतरे भूषण, ‘भारतीय स्वातंत्र्यलढा व स्त्रिया’, समाजप्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून 2012, प्रकाशक–प्रा. विलास वाघ, समाज प्रबोधन संस्था, पुणे.

४. पाटील भारती, ‘स्त्रिया, समाज आणि राजकारण’, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. डॉ. कडू मोहिनी, ‘भारतीय राजकारणातील स्त्रिया’, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 15 जुलै 2008.